ePaper

**शेतकरी, महिला, युवक, नोकरदार यांना केंद्रबिंदू मानून अंतरिम अर्थसंकल्प!**



| वर्ष - 7 । अंक - 261 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 02 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


**आतील पानांत**


- अधिक चतुराईने खेळण्याची गरज!
- शिल्पाचा 'या' पुरस्काराने गौरव
- म्हणून नितीश कुमार आमच्याबरोबर
- छगन भुजबळ भाजपाच्या वाटेवर?


# विकसित भारताची पायाभरणी!

## अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केला अंतरिम अर्थसंकल्प!

## अर्थसंकल्पात सर्वाधिक तरतूद संरक्षण मंत्रालयासाठी

**। नवी दिल्ली ।महाईन्यूज**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अंतरिम अर्थसंकल्प सादर केला आहे. सर्वसामान्यांचं लक्ष लागून राहिलेल्या कर रचनेत त्यांनी कोणताही बदल केलेला नाही. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कररचनेमध्ये कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. प्राप्तिकराच्या रचनेत बदल होणा नसल्याची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केली. लोकसभा निवडणुकीला अवघे काही महिने शिल्लक असल्यानं मोदी सरकारसाठी हा अर्थसंकल्प महत्त्वाचा आहे. विकसित भारताच्या पायाभरणीला पोषक असून, शेतकरी, महिला, युवक, नोकरदार यांना केंद्रबिंदू मानून हा अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. प्राप्तिकराच्या रचनेत कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सर्वसामान्यांना झटका बसला आहे. अंतरिम अर्थसंकल्पावर नजर टाकल्यास सर्वाधिक तरतूद संरक्षण मंत्रालयासाठी करण्यात आली आहे.

अर्थसंकल्पाची परंपरा कायम राखत आहोत, असं अर्थमंत्री सीतारामन म्हणाल्या. अंतरिम अर्थसंकल्पात लोकानुनय करणाऱ्या घोषणा केल्या जात नाहीत. त्यामुळेच मोदी सरकारनंही निवडणुकीआधीच्या अर्थसंकल्पात लोकानुनयी घोषणा टाळल्या. कर रचनेत कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. वार्षिक ७ लाखांपर्यंतचं उत्पन्न असलेल्यांना कोणताही कर भरावा लागणार नाही. आयकर भरण्याची प्रक्रिया सोपी करण्यात आली असल्याचं सीतारामन म्हणाल्या. रिफंड मिळण्याची प्रक्रिया वेगवान करण्यात आली आहे. जीएसटीमधून मिळणारा महसूल दुप्पट झाला आहे. वित्तीय तूट ५.१ टक्के राहण्याचा अंदाज आहे. गेल्या १० वर्षांत सरकारला आयकराच्या माध्यमातून मिळणारं उत्पन्न तिपटीनं वाढलं आहे, अशी माहिती सीतारामन यांनी दिली. रेल्वे मंत्रालय- केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या रेल्वे मंत्रालयाचं बजेटही वाढवण्यात आलं आहे. यंदा रेल्वेला २.५५ लाख कोटी देण्यात आले आहेतरेल्वेसाठी २.४ लाख कोटींची तरतूद करण्यात आली होती. अर्थमंत्री सीतारामण यांनी तीन मोठ्या रेल्वे कॉरिडॉरची घोषणा केली आहे. रेल्वेच्या ४० हजार डब्यांचं वंदे भारतामध्ये रुपांतर करण्यात येणाकर असल्याचंही त्यांनी सांगितलं आहे.






### कोणाला किती कर भरावा लागणार?

- ० ते ३ लाख रुपये- ० टक्के कर
- ३ लाख ते ६ लाख रुपये- ५ टक्के कर
- ६ लाख ते ९ लाख रुपये- १० टक्के कर
- ९ लाख ते १२ लाख रुपये- १५ टक्के कर
- १२ लाख ते १५ लाख रुपये- २० टक्के
- १५ लाखांपेक्षा अधिक रुपये- २० टक्के अधिक ३ टक्के (प्रत्येक अतिरिक्त लाख रुपयांमागे)

### राजनाथांचा पॉवरफुल डिफेन्स

संरक्षण मंत्रालय- राजनाथ सिंह यांच्या अखत्यारित येणाऱ्या मंत्रालयासाठी सर्वाधिक ६.२० लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आत्मनिर्भर होण्यावर आपला भर असल्याचं सीतारामन म्हणाल्या. २०२३-२४ वर्षात संरक्षण क्षेत्रासाठी ६.०२ लाख कोटींची तरतूद करण्यात आली होती. यंदा त्यात ३.४ टक्क्यांची वाढ झाली आहे. भाजपच्या सरकारने २५ कोटी लोकांना गरिबीतून वर काढले, मोठ्या प्रमाणावर रोजगार पुरविले, शेतमालास किमान आधारभूत भाव दिला, सरकार म्हणून आम्ही विषमता दूर करत आहोत; सामाजिक न्याय प्रस्थापित केला आहे, असेही अर्थमंत्र्यांनी सांगितले.

### गडकरींच्या खात्याला किती?

रस्ते वाहतूक आणि महामार्ग- नितीन गडकरींच्या मंत्रालयासाठी बजेट यावेळीदेखील वाढवण्यात आलं आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग विभागाकडून देशाच्या कानाकोपऱ्यात महत्त्वाचे प्रकल्प सुरू आहेत. गडकरींच्या विभागासाठी २.७८ लाख कोटींची तरतूद करण्यात आली आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग- नितीन गडकरींच्या मंत्रालयासाठी बजेट यावेळीदेखील वाढवण्यात आलं आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग विभागाकडून देशाच्या कानाकोपऱ्यात महत्त्वाचे प्रकल्प सुरू आहेत. गडकरींच्या विभागासाठी २.७८ लाख कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

### प्रधानमंत्री सूर्योदय योजनेचा काय होईल लाभ

अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्री म्हणाल्या की, प्रधानमंत्री सूर्योदय योजनेअंतर्गत एक कोटी घरांना दरमहा ३०० युनिट मोफत वीज मिळेल, ज्यामुळे ग्राहकांचे दरवर्षी १५,००० ते १८,००० रुपयांची बचत होईल, असा दावा केला. योजनेच्या लाभार्थ्यांना कमी वीज बिल येईल आणि वार्षिक १८,००० रुपयांपर्यंत बचत होईल. या योजनेसाठी पात्र लोक घराच्या छताचा वीज निर्मितीसाठी योग्य वापर करू शकतील. तसेच वीज ग्राहकांना सौर पॅनेल बसवण्यासाठी जमीन खरेदी करण्याची गरज भासणार नाही, ज्यामुळे कार्बन उत्सर्जन कमी होईल आणि देशात स्वच्छ ऊर्जेला चालना मिळेल.

# मराठा सर्वेक्षणाला मुदतवाढ नाही

## 2 फेब्रुवारीला रात्री बारा वाजता सर्वेक्षणाची संगणकप्रणाली बंद

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गातील सर्वेक्षणाची वाढवून दिलेली मुदत शुक्रवारी (२ फेब्रुवारी) संपत आहे. मात्र, राज्यातील बहुतांश भागात सर्वेक्षणाचे बरेचसे काम प्रलंबित आहे. तरीदेखील सर्वेक्षणाला मुदतवाढ मिळणार नसल्याचे महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने बुधवारी रात्री स्पष्ट केले. त्यानुसार २ फेब्रुवारीला रात्री बारा वाजता सर्वेक्षणाची संगणकप्रणाली बंद करण्यात येणार आहे.**




सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांनी राज्यभरातील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे गुरुवारी बैठक घेतली. या बैठकीत सर्वेक्षणाचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये राज्यातील ग्रामीण भागात सर्वेक्षण सरासरी ७० टक्क्यांच्या आसपास झाले आहे. मात्र, शहरी भागात सर्वेक्षण कमी झाले आहे. परिणामी महापालिका आयुक्तांनी सर्वेक्षणाला मुदतवाढ देण्याची मागणी केली. शनिवार-रविवार सुटीच्या दिवशी कर्मचाऱ्यांना कामाला लावून सर्वेक्षण पूर्ण करता येईल, असे बैठकीत एकमताने सांगण्यात आले. त्यानुसार राज्य शासनाच्या वतीने मागासवर्ग आयोगाला मुदतवाढ देण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र, ही विनंती फेटाळण्यात आली.राज्य मागासवर्ग आयोगाच्या सचिव आ. उ. पाटील यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त यांना पत्र दिले आहे. त्यामध्ये आयोगाने २ फेब्रुवारी २०२४ पर्यंत सर्वेक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. सर्वेक्षणासाठी मुदतवाढ देण्यात येणार नाही, तरी मुदतवाढीची मागणी करू नये. २ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजून ५९ मिनिटांनी (२३:५९) सर्वेक्षणाची संगणक प्रणाली (सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन) बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे त्यापूर्वी सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्याबाबत प्रगणकांना सूचना देण्यात याव्यात आणि ३ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजेपर्यंत सर्वेक्षण पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आयोगाकडे सादर करण्यात यावे, असे नमूद केले आहे. या पत्राची प्रत मुख्य सचिव, मुख्यमंत्री यांचे खासगी सचिव, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आणि सर्व विभागीय आयुक्त यांनाही पाठविण्यात आली आहे.सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांनी राज्यभरातील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे गुरुवारी बैठक घेतली. या बैठकीत सर्वेक्षणाचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये राज्यातील ग्रामीण भागात सर्वेक्षण सरासरी ७० टक्क्यांच्या आसपास झाले आहे. मात्र, शहरी भागात सर्वेक्षण कमी झाले आहे. परिणामी महापालिका आयुक्तांनी सर्वेक्षणाला मुदतवाढ देण्याची मागणी केली. शनिवार-रविवार सुटीच्या दिवशी कर्मचाऱ्यांना कामाला लावून सर्वेक्षण पूर्ण करता येईल, असे बैठकीत एकमताने सांगण्यात आले. त्यानुसार राज्य शासनाच्या वतीने मागासवर्ग आयोगाला मुदतवाढ देण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र, ही विनंती फेटाळण्यात आली. राज्य मागासवर्ग आयोगाच्या सचिव आ. उ. पाटील यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त यांना पत्र दिले आहे. त्यामध्ये आयोगाने २ फेब्रुवारी २०२४ पर्यंत सर्वेक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे.

### सर्वेक्षणाचे बरेचसे काम प्रलंबित

सर्वेक्षणासाठी मुदतवाढ देण्यात येणार नाही, तरी मुदतवाढीची मागणी करू नये. २ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजून ५९ मिनिटांनी (२३:५९) सर्वेक्षणाची संगणक प्रणाली (सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन) बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे त्यापूर्वी सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्याबाबत प्रगणकांना सूचना देण्यात याव्यात आणि ३ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजेपर्यंत सर्वेक्षण पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आयोगाकडे सादर करण्यात यावे, असे नमूद केले आहे. या पत्राची प्रत मुख्य सचिव, मुख्यमंत्री यांचे खासगी सचिव, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आणि सर्व विभागीय आयुक्त यांनाही पाठविण्यात आली आहे.मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गातील सर्वेक्षणाची वाढवून दिलेली मुदत शुक्रवारी (२ फेब्रुवारी) संपत आहे. मात्र, राज्यातील बहुतांश भागात सर्वेक्षणाचे बरेचसे काम प्रलंबित आहे.

# विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात पावसाचा अंदाज

## प्रशांत महासागरात सक्रिय असलेली एल-निनोची स्थिती सक्रिय

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रशांत महासागरात सक्रिय असलेली एल-निनोची स्थिती फेब्रुवारी महिन्यांतही सक्रिय राहण्याचा अंदाज आहे. मात्र, फेब्रुवारीनंतर एल-निनोची स्थिती हळूहळू कमजोर पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यता वाढली आहे.**

भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत महासागरात एल-निनोची स्थिती कायम आहे. तेथील समुद्रातील पाण्याचे तापमान सरासरीपेक्षा जास्तच आहे. फेब्रुवारीअखेरपर्यंत ही स्थिती कायम राहण्याचा अंदाज आहे. फेब्रुवारीनंतर एल-निनो स्थिती हळूहळू कमजोर पडण्याचा अंदाज आहे. तसे झाल्यास यंदाच्या पावसाळ्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यता वाढली आहे. तसेच हिंदी महासागरातील द्वि-ध्रुविताही सध्या सक्रिय आहे. पुढील एक दोन महिन्यांत ही स्थिती तटस्थ अवस्थेत पोहचण्याची शक्यता आहे.फेब्रुवारी महिन्यात देशभरात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याचा अंदाज आहे. फेब्रुवारी महिन्यात देशभरात सरासरी २२.७ मिमी पाऊस



पडतो, सरासरीच्या तुलनेत ११९ टक्के पावसाचा अंदाज आहे. राज्यात प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात पाऊस पडण्याचा अंदाज आहे. मागील वर्षभर किमान तापमान सरासरीपेक्षा जास्तच राहिले होते. जानेवारी महिन्यात किमान तापमान सरासरीपेक्षा एक ते तीन अंश सेल्सिअसने जास्तच राहिले आहे. फेब्रुवारी महिन्यातही किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. कमाल तापमान देशभरात जास्त राहण्याचा अंदाज आहे. मात्र, राज्यात मुंबई, किनारपट्टी वगळता कमाल तापमान सरासरी इतकेच राहण्याची शक्यता आहे. फेब्रुवारी महिन्यात उत्तर भारतात थंडीची लाट येण्याची शक्यता कमीच आहे.जानेवारी महिन्यांत देशभरात सरासरी ७.२ मिमी पाऊस पडला आहे. १९०१ ते २०२४ या काळातील नवव्या क्रमांकाचा सर्वांत कमी पाऊस झाला आहे. जानेवारी महिन्यांत देशात सरासरी १७.१ मिमी पाऊस पडतो.

### गेल्या महिन्यात 7.2 मिमी पाऊस

विभागनिहाय विचार करता उत्तर भारतात सरासरी ३३.८ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात फक्त ३.१ मिमी पाऊस पडला. ईशान्य भारतात सरासरी १७.२ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात ५.६ मिमी पाऊस झाला. मध्य भारतात सरासरी ७.४ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात ५.३ मिमी पाऊस झाला. दक्षिण भारतात सरासरी ७.८ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात १८.२ मिमी म्हणजे सरासरीच्या १३३ टक्के पाऊस पडला. प्रशांत महासागरात सक्रिय असलेली एल-निनोची स्थिती फेब्रुवारी महिन्यांतही सक्रिय राहण्याचा अंदाज आहे. मात्र, फेब्रुवारीनंतर एल-निनोची स्थिती हळूहळू कमजोर पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यता वाढली आहे.

## ‘महाईन्यूज’च्या वृत्ताची दखल

# मुख्य अभियंत्यांना मिळाला कार्यभार!

## महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी अखेर घेतला निर्णय

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य संवर्गातील शहर अभियंता आणि मुख्य अभियंता यांच्याकडे विविध विभागांच्या नियंत्रणाची जबाबदारी सोपविण्यात आली असून याबाबत सामान्य प्रशासन विभागाने आयुक्त शेखर सिंह यांच्या स्वाक्षरीने स्वतंत्र आदेश निर्गमित केले आहेत.**


ePaper “राजकीय जीवनात माझ्यावर दोन संकटं आली”, हसन मुश्रीफांना अश्रू अनावर!

। वर्ष - 7 । अंक - 259 । UDYAM-MH-26-0158827 ।

महाईन्यूज™ लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत
- विराट-जडेजाला मारण्याची धमकी
- मयुरी देशमुखचा 'लग्नकल्लोळ'
- भाजपचे नवे राजकारण!
- ३,१६,३०० कोटींचे सामंजस्य करार

www.mahaenews.com । मंगळवार, दिनांक 30 जानेवारी 2024 । पिंपरी-चिंचवड आवृत्ती । mahaenews.com । maha_enews । Mahaenews

मुख्य अभियंता ‘नामधारी’!

पदभार वाटपाला मुहूर्त मिळेना : आयुक्त शेखर सिंह यांचा वेळकाढूपणा?

अधिकराव दिवे- पाटील । पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नव्या सुधारित २०२३ च्या आकृतीबंधात अभियांत्रिकी विभागातील शहर अभियंता या पदाला समकक्ष दर्जाचे मुख्य अभियंता ही दोन पदे निर्माण केली आहेत. त्या पदावर सेवा ज्येष्ठतेनुसार सह शहर अभियंता श्रीकांत सवणे आणि रामदास तांबे यांची नियुक्त करण्यात आली. त्याला राज्य सरकारने मंजुरीही दिली. मात्र, प्रशासनातील राजकीय कुरघोड्यांमुळे अद्याप दोन्ही अधिकाऱ्यांना पदभार वाटप करण्यात आला नाही.

महापालिका कार्यक्षेत्रात झपाट्याने वाढणारी लोकसंख्या तसेच, पालिकेत समाविष्ट झालेल्या गावांचा विचार करता कामाचा वाढला आहे. त्यामुळे पुणे पालिकेच्या धर्तीवर शहर अभियंता यांची वेतनश्रेणी बांधकाम ... अभियंता समकक्ष मुख्य अभियंता (प्रोजेक्ट्स) व मुख्य अभियंता (पर्यावरण) या दोन पदांची नव्या पदनिर्मिती व सेवा प्रवेश नियम लागू करण्याबाबत महापालिका सर्वसाधारण सभेत दि. २० सप्टेंबर २०२१ रोजी ठराव मंजूर ... त्याबाबदल प्रशासकीय दखल घेतली जात नव्हती. आता शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी याबाबत पाठपुरावा सुरू केला. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती.

त्यानंतर नगर विकास विभागाकडून दि. २३ ऑगस्ट ... तसेच मुख्य अभियंता अभिमानाची पदनिर्मिती, वेतनश्रेणी, प्रमाण आर्हता मंजूर करण्यात आल्याचा आदेश जारी करण्यात आला.

त्यानंतर ऑक्टोबर- २०२३ मध्ये श्रीकांत सवणे आणि रामदास तांबे या दोन अधिकाऱ्यांची या पदावर नियुक्ती करण्यात आली. परंतु, गेल्या ३ महिन्यांपासून ...

अधिकार वाटपासाठी अडचण काय?

महापालिका मुख्य शहर अभियंता समकक्ष पदनिर्मिती प्रस्ताव महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात रखडला. त्यावर निर्णय घेण्यासाठी महायुती सरकारची वाट पहावी लागली. त्यानंतर पदांना मंजुरी मिळाल्यानंतर अधिकार वाटप आणि कुणाची वर्णी लागणार याबाबत खलबते झाली. संबंधित अधिकाऱ्यांनी नियुक्ती मिळाल्यानंतर आता त्यांच्या अधिकार वाटपाबाबत प्रतीक्षा करावी लागत आहे. राज्यात महायुतीचे सरकार आहे. महापालिकेत प्रशासकीय राजवट आहे. असे असतानाही आयुक्त शेखर सिंह केवळ अधिकार वाटपासाठी विलंब का करीत आहेत, याचे आश्चर्य व्यक्त होत आहे.

आयुक्तांचा वेळकाढूपणा कशासाठी?

महापालिका प्रशासकीय कामकाजामध्ये सुसूत्रता यावी. या करिता २०२१ मध्ये सर्वसाधारण सभेमध्ये आकृतीबंधानुसार दोन मुख्य अभियंता पदांची निर्मिती करण्याबाबत प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. त्यावर निर्णय घेण्यासाठी दोन-अडीच वर्षे प्रतीक्षा करावी लागली. अधिकारी नियुक्तीचा निर्णय झाल्यानंतर प्रशासकीय प्रमुख या नात्याने शेखर सिंह यांनी तात्काळ कार्यवाही करणे अपेक्षित होते. ज्यामुळे सर्व विभागाचे कामकाज गतीमान करता आले असते. पण, भामा आसखेड जॅकवेल, केबल डक्टिंग, वाकडमधील टीडीआर असे अनेक निर्णय स्वतःच्या अधिकारात आणि सडेतोडपणे घेणारे शेखर सिंह मुख्य ...



मकरंद निकम रामदास तांबे श्रीकांत सवणे

‘महाईन्यूज’ ने याबाबत आक्रमक वृत्तांकन करीत प्रशासन आणि आयुक्त शेखर सिंह यांचे लक्ष वेधले होते. त्याची दखल घेत अखेर आयुक्तांनी अधिकारांचे वाटप केले. त्यामुळे अभियांत्रिकी विभागात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर अभियंता या पदावर मकरंद निकम कामकाज पाहत आहेत तर नुकतेच मुख्य अभियंता पदी श्रीकांत सवणे आणि रामदास तांबे यांची नेमणूक करण्यात आली होती. या तीनही अधिकाऱ्यांमध्ये स्थापत्य अभियांत्रिकी उपविभागांची जबाबदारी विभागून देण्यात आली आहे.

शहर अभियंता मकरंद निकम यांच्याकडे बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, स्थापत्य विभाग आणि सर्व क्षेत्रीय कार्यालयांकडील स्थापत्य विषयक कामकाजाचे संपूर्ण नियंत्रण सोपविण्यात आले आहे.

मुख्य अभियंता श्रीकांत सवणे यांच्याकडे पाणीपुरवठा व प्रकल्प विभागाचे नियंत्रण सोपविण्यात आले आहे.

मुख्य अभियंता रामदास तांबे यांच्याकडे उद्यान व क्रीडा स्थापत्य विभाग, पर्यावरण अभियांत्रिकी विभाग, जलनि:सारण विभाग तसेच झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन स्थापत्य बीएसयूपी, प्रधानमंत्री आवास योजना विभागाचे नियंत्रण सोपविण्यात आले आहे.

### अंतिम अधिकार आयुक्तांकडे राखीव...

या अधिकाऱ्यांच्या अखत्यारीतील विभागांच्या विभाग प्रमुखांमार्फत प्रशासकीय तसेच धोरणात्मक निर्णयांसंबंधीच्या नस्त्या आणि महापालिका समिती, स्थायी समिती यांना सादर करायचे सर्व प्रस्ताव अतिरिक्त आयुक्त यांच्यामार्फत महापालिका आयुक्त यांची मान्यता घेऊनच सादर करण्यात याव्यात असे आदेशात नमूद केले आहे. अधिकारांमध्ये बदल करणे अथवा निरस्त करणे याबाबतचे हक्क आयुक्त शेखर सिंह यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

---

## टाळगाव चिखलीला ‘क’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा!

## पायाभूत सोयी-सुविधा होणार सक्षम : भाजपा आमदार महेश लांडगेयांचा विश्वास

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**वारकरी संप्रदायाचे मुख्य तीर्थस्थान श्रीक्षेत्र देहू आणि श्रीक्षेत्र आळंदीच्या मधोमन वसलेले टाळगाव चिखली गावाला आता ‘क’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे या गावातील पायाभूत सोयी-सुविधा सक्षम होण्यास मदत होईल, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.**




मौजे टाळगाव चिखलीला ‘क’ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वात दि. १९ मे २०२३ रोजी झालेल्या पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत तशी घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना पत्राद्वारे कळवले आहे.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, “जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे वैकुंठगमन झाले. त्यावेळीत्यांचे टाळ चिखली येथे पडले होते” त्यामुळे गावाला टाळगाव चिखली असे नाव पडले, अशी सांगितली जाते. त्या घटनेचे साक्षीदार असलेले टाळ मंदिर आजही गावात आहे. तसेच महाराजांच्या १४ टाळकऱ्यांपैकी एक टाळकरी चिखली गावातील होते. इंद्रायणी नदीकाठी वसलेल्या गावाला चोहोबाजूने तटबंदी होती. ग्वाल्हेरचे देवराम कृष्णराव जाधवराव यांची गढी आहे. त्यामुळे गावाला धार्मिक, ऐतिहासिक आणि वारकरी संप्रदायाचा वारसा लाभला आहे. तसेच, गावातील श्री. भैरवनाथ हे जागृत देवस्थान म्हणून पंचक्रोशीमध्ये परिचित आहे.

### संतपीठामुळे महाराष्ट्रभरात ख्याती...

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या पुढाकाराने महाराष्ट्रातील पहिले जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ उभारण्यात आले आहे. चिखलीगाव, जाधववाडी, कुदळवाडी, मोरेवस्ती, म्हेत्रेवस्ती, पवार वस्ती, हरगुडेवस्ती या संपूर्ण भागाचा गावात समावेश आहे. १९९७ मध्ये पिंपरी-चिंचवड महापालिकेत गावाचा समावेश झाला असून, २०१७ मध्ये भारतीय जनता पार्टी च्या सत्ताकाळात चिखली आणि परिसरात प्रलंबित विकासकामांना गती देण्यात आली आहे. आता ‘क’ वर्ग पर्यटनस्थळाचा मिळाल्यामुळे पायाभूत सोयी-सुविधा आणखी सक्षम करण्यास मदत होणार आहे, असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला.




**चंडीगड महापौरपदाच्या निवडणुकीत झालेल्या तमाशाचे वर्णन लोकशाहीला काळिमा असेच करावे लागेल. चंडीगडचा हा प्रघात पडल्यास भविष्यात देशातील निवडणूक व्यवस्थाच निकालात निघण्याची भीती व्यक्त केली जाते आहे.**

# कोणाकडेच बहुमत नाही

केंद्रशासित असलेल्या चंडीगड महानगरपालिकेची सदस्यसंख्या ३६ असून भाजपचे १६, आम आदमी पार्टीचे १३, काँग्रेसचे ७ तर शिरोमणी अकाली दलाचा एक असे संख्याबळ आहे. थोडक्यात कोणाकडेच बहुमत नाही. इंडिया आघाडीचे घटक पक्ष ‘आप’ आणि काँग्रेस एकत्र आल्याने त्या दोघांचे संख्याबळ २० झाले. त्यामुळे ‘आप’चा महापौर निवडून येणार ही केवळ औपचारिकता होती. पण लोकसभेपासून ग्रामपंचायतीपर्यंत कोणतीही निवडणूक काहीही करून जिंकायचीच असा भाजपचा पक्का निर्धार असतो. भाजपला मतदारांचा कौल असल्यास याबद्दल तक्रार करण्याचे कारण नाही. पण चंडीगडमध्ये निवडणूक जिंकण्यासाठी सारी निवडणूक प्रक्रियाच गुंडाळून ठेवण्यात आली.महापौरपदासाठी १८ जानेवारीला निवडणूक होणार होती. पण निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले भाजपचे नगरसेवक ऐनवेळी आजारी पडले. परिणामी निवडणूक लांबणीवर पडली. आता



हे महाशय खरे आजारी पडले होते का, या संशोधनाचा विषय ठरावा. कारण महापौर निवडणुकीत त्यांनी जो काही प्रकार केला त्यावरून हे सारे पूर्वनियोजितच होते, असे दिसते. लांबणीवर पडलेली निवडणूक घेतली जावी यासाठी ‘आप’ने न्यायालयाचे दरवाजे ठोठावल्यावर न्यायालयाने ३० तारखेला निवडणूक घेण्याचा आदेश दिला. न्यायालयाच्या आदेशानुसार मतदानाची प्रक्रिया पार पडल्यावर पीठासीन अधिकारी असलेल्या भाजपच्या नगरसेवकाने जो प्रताप केला त्याला तोड नाही, असेच म्हणावे लागेल. पीठासीन अधिकारी मतदानापूर्वी मतपत्रिकांवर स्वाक्षरी करतात.

पण येथे मतदान पूर्ण झाल्यावर सर्वांना दूर करून पीठासीन अधिकाऱ्याने मतपत्रिकांवर स्वाक्षरी करण्यास सुरुवात केली. ते काही ठरावीक मतपत्रिकांवर पेनाने खुणा करीत असल्याची चित्रफीत दिल्लीचे मुख्यमंत्री आणि ‘आप’चे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी समाजमाध्यमातून प्रसारित केली आहे. मतपत्रिकांवर खुणा असल्यास मतपत्रिका बाद ठरविली जाते, असा नियम आहे. ‘आप’च्या उमेदवाराला मत असलेल्या मतपत्रिकेवर बहुधा पीठासीन अधिकाऱ्याने पेनाने खुणा केल्या असाव्यात. त्यानुसार आठ मतपत्रिका बाद ठरवल्या गेल्या. साहजिकच भाजपच्या उमेदवाराला १६ तर ‘आप’च्या उमेदवाराला १२ मते मिळाली. भाजपचे मनोज सोनकर हे महापौरपदी निवडून आल्याचे पीठासीन अधिकाऱ्याने जाहीर केले. ‘आप’ व काँग्रेसच्या नगरसेवकांनी आठ मतपत्रिका का बाद ठरवल्या याचा जाब विचारल्यावर पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहात उत्तर दिले नाही. नंतर मतपत्रिकांवर खुणा होत्या म्हणून बाद ठरविल्याचा दावा केला. पण हे पीठासीन अधिकारी ठरावीक मतपत्रिकांवर पेनाने खुणा करताना चित्रफितीत स्पष्ट दिसत आहेत.भाजपने निवडणूक जिंकण्यासाठी लोकशाहीची सारी मूल्येच पायदळी तुडवली आहेत. या पक्षाची केंद्रात सत्ता आहे, देशातील १५ पेक्षा अधिक राज्यांमध्ये सत्ता आहे, विविध संस्था ताब्यात आहेत, तरीही एका महापालिकेसाठी या पद्धतीने निवडणूक प्रक्रियेचाच गळा घोटायचा? समजा, भाजपला चंडीगड महानगरपालिकेचे महापौरपद मिळाले नसते तर असा काय मोठा फरक पडला असता ? इंदिरा गांधींच्या आणीबाणी लादण्याच्या निर्णयातील हुकूमशाही प्रवृत्तीवर टीका करण्यात भाजप, जनसंघाची मंडळी आघाडीवर असायची. मग चंडीगडमध्ये जे घडले ते हुकूमशाहीपेक्षा काय वेगळे होते? भाजपकडून विरोधी पक्षांची सरकारे अस्थिर केली जात असल्याचा आरोप केला जायचा. चंडीगडमध्ये तर सरळ सरळ निवडणूक प्रक्रियाच ताब्यात घेण्यात आली. विविध राज्यांच्या विधानसभांमध्ये विश्वासदर्शक किंवा अविश्वास ठरावांवर सभागृहात गोंधळ झाल्याचे अनेकदा अनुभवास आले.

## संपादकीय »

# ‘फिक्सर’ची फजिती!

***एके काळी पाकिस्तानी क्रिकेटला वैभव मिळवून देणारे त्या देशाचे कप्तान इम्रान यांना राजकारणातील फिक्सिंगने का व कशी भुरळ पाडली, हे सांगता येत नाही.***

पाकिस्तानमध्ये पुढील आठवड्यात सार्वत्रिक निवडणुका होत आहेत. या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून लढण्याची इम्रान खान यांची पात्रता तेथील एका न्यायालयाने रद्द ठरवली आहे. या निवडणुका म्हणजे एक प्रकारचे ‘फिक्सिंग’ असल्याची मल्लिनाथी इम्रान यांनी एका मुलाखतीत केली होती. गेल्या दोन दिवसांत दोन प्रकरणांमध्ये तेथील न्यायालयांनी इम्रान यांना १० आणि १४ वर्षे तुरुंगवासाच्या शिक्षा ठोठावल्या आहेत. याआधीच एका प्रकरणात त्यांना तीन वर्षे कारावासाची शिक्षा झालेली होती. म्हणजे आता एकूण तीन शिक्षा. त्या एकाच काळात भोगायच्या की पाठोपाठ भोगायच्या याविषयी स्पष्टता नाहीपाकिस्तानातील विश्लेषक सांगतात. परंतु दरम्यानच्या काळात इम्रान यांच्या पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफ (पीटीआय)च्या समर्थकांचीही मोठ्या प्रमाणात धरपकड झाली.

**दादा कोंडकेंपासून दामूअण्णा मालवणकर, शरद तळवलकर ते अशोक सराफ यांच्यापर्यंतच्या कलाकारांप्रती प्रेक्षकांची हीच दिलखुलास, गुणग्राहक वृत्ती दिसून आलेली आहे. अभिनयकौशल्याने प्रेक्षकांची करमणूक करणाऱ्या अशोक सराफ यांना ‘महाराष्ट्र भूषण’ पुरस्कार मिळाल्याने त्यावर राजमान्यतेचीही मोहोर उमटली आहे.**

# नाटकांतून रंगभूमीवरचे पहिले धडे गिरवले

मुंबईत जन्मलेल्या अशोक सराफांनी आपले मामा गोपीनाथ सावकार यांच्या छत्रछायेखाली नाटकांतून रंगभूमीवरचे पहिले धडे गिरवले. ‘ययाती आणि देवयानी’ या नाटकाद्वारे ते रंगभूमीवर पदार्पण करते झाले. संगीत नाटकांतूनही भूमिका केल्या. विजया मेहतांच्या ‘हमिदाबाईची कोठी’मधील त्यांची काहीशी नकारात्मक भूमिकाही गाजली. ‘डार्लिंग डार्लिंग’, ‘मनोमीलन’, ‘सारखं छातीत दुखतंय’, ‘व्हॅक्युम क्लीनर’ आदी नाटकांतून त्यांनी विविधरंगी भूमिका रंगवल्या. दादा कोंडकेंच्या ‘पांडू हवालदार’ तसेच ‘राम राम गंगाराम’मधील त्यांनी साकारलेला म्हमद्या चिक्कार गाजला. आपल्याला टक्कर देऊ शकणाऱ्या या कलाकाराला आपल्या पुढच्या चित्रपटांत घेणे मात्र दादा कोंडकेंनी टाळले असे म्हणतात. ८० च्या दशकात लक्ष्मीकांत बेर्डे यांच्याबरोबर त्यांची विनोदवीर म्हणून जोडी जमली.



सचिन पिळगावकर, महेश कोठारे या दिग्दर्शकांच्या विनोदी चित्रपटांनी हे दशक गाजले. त्यात या जोडीचीही तितकीच कमाल होती. ‘अशी ही बनवाबनवी’, ‘नवरी मिळे नवऱ्याला’, ‘गंमतजंमत’, ‘भुताचा भाऊ’, ‘आयत्या घरात घरोबा’, ‘आत्मविश्वास’, ‘नवरा माझा नवसाचा’, ‘वजीर’, ‘चौकट राजा’, ‘कळत नकळत’, ‘निशाणी डावा अंगठा’ असे विनोदी तसेच गंभीर विषय हाताळणारे चित्रपट त्यांनी केले. ‘हम पांच’, ‘छोटी बडी बातें’, ‘डोन्ट वरी हो जाएगा’ अशा हिंदी मालिकांतूनही त्यांनी अभिनयाची छाप पाडली. याच काळात काही हिंदी चित्रपटांतूनही कामे केली. ‘सिंघम’, ‘करण अर्जुन’, ‘कोयला’, ‘गुप्त’, ‘प्यार किया तो डरना क्या’ ही त्यांतली काही नावे. गंभीर, खलनायकी छटा असलेल्या भूमिकाही त्यांनी समरसून व ताकदीने साकारल्या. विलक्षण बोलका चेहरा, संवादफेकीवरील प्रचंड हुकूमत, परिस्थितीजन्य विनोदाची समज ही त्यांच्या अभिनयाची बलस्थाने. पण त्यांच्या अभिनयाच्या क्षमतेला आव्हान देणारी भूमिका मात्र त्यांच्या वाट्याला फार क्वचितच आली. महाराष्ट्र राज्य पुरस्कारांसह असंख्य पुरस्कार त्यांना या कलाप्रवासात लाभले. अलीकडेच त्यांचे आत्मकथनही प्रसिद्ध झाले आहे. अजूनही ते रंगभूमीवर उत्साहाने सक्रीय आहेत. अशा प्रतिभावान कलाकाराचा राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराने केव्हाच सन्मान व्हायला हवा होता. निदान राज्य सरकारने तरी त्यांच्या कलाकीर्दीची दखल घेतली, हेही नसे थोडके.मुंबईत जन्मलेल्या अशोक सराफांनी आपले मामा गोपीनाथ सावकार यांच्या छत्रछायेखाली नाटकांतून रंगभूमीवरचे पहिले धडे गिरवले. ‘ययाती आणि देवयानी’ या नाटकाद्वारे ते रंगभूमीवर पदार्पण करते झाले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)


# छगन भुजबळ भाजपाच्या वाटेवर?

## » सोशल मीडियावर पोस्ट आल्याने राजकीय चर्चांना उधाण

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादीचे बडे नेते अशी छगन भुजबळ यांची ओळख आहे. याच छगन भुजबळ यांची चांगलीच चर्चा गेल्या काही महिन्यांपासून रंगली आहे. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधात घेतलेली भूमिका. ओबीसींच्या आरक्षणातून मराठ्यांना आरक्षण देऊ नका त्यांना वेगळं आरक्षण द्या अशी भूमिका छगन भुजबळ यांनी सातत्याने घेतली आहे.**

तसंच मनोज जरांगे पाटील यांनी जेव्हा आरक्षण मिळवल्याचा दावा केला तेव्हा त्यावरही त्यांनी आक्षेप घेतला. येत्या काही दिवसात छगन भुजबळ हे ओबीसींची सभाही घेणार आहेत. अशात छगन भुजबळ भाजपाच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरु झाली आहे. या चर्चेचं कारणही तसंच आहे.मराठा आरक्षणाचा अध्यादेश काढल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबईतल्या मोर्चाला मराठा आरक्षण देण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचं पुन्हा एकदा सांगितलं. मात्र छगन भुजबळ यांनी ओबीसीतून आरक्षण देण्यास विरोध दर्शवला. मराठा आरक्षणावरुन छगन भुजबळ हे मंत्रिपदाचा राजीनामा देऊ शकतात अशीही चर्चा सुरु आहे. अशात बुधवारी शिवसेना आमदार संजय गायकवाड आणि संजय शिरसाट या दोन्ही नेत्यांनी मंत्रिमंडळातून छगन भुजबळ यांची हकालपट्टी करावी अशी मागणी केली होती. यानंतर दुसऱ्याच दिवशी छगन भुजबळ भाजपाच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरु झाली. याचं महत्त्वाचं कारण आहे अंजली दमानिया यांनी केलेली पोस्ट.सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी काही वेळापूर्वीच एक पोस्ट लिहिली आहे. या पोस्टमध्ये अंजली दमानिया म्हणतात,"भुजबळ भाजपाच्या वाटेवर?, एकेकाळी भुजबळांच्या भ्रष्टाचाराविरुद्ध जनहित याचिका करणारा भाजपा त्यांना मोठा ओबीसी नेता बनवणार? अशा भ्रष्ट माणसांना मोठं करणार, राजकारणासाठी? कुठे फेडाल हे पाप" अशी पोस्ट त्यांनी लिहिली आहे. त्यामुळे छगन भुजबळ हे भाजपाच्या वाटेवर आहेत का? अशी चर्चा सोशल मीडियावर सुरु झाली आहे. छगन भुजबळ यांनी त्यांच्या राजकीय आयुष्याची सुरुवात ही शिवसेना या पक्षापासून केली होती. शिवसेनेचे आक्रमक नेते म्हणून त्यांची ओळख होती. शिवसेनेला सोडचिठ्ठी देणारे ते पहिले बंडखोर होते. बाळासाहेब ठाकरे यांनी अनेक वर्षे त्यांचा उल्लेख लखोबा लोखंडे असा केला होता. १९९१ मध्ये छगन भुजबळ यांनी शिवसेना सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला. १९९९ मध्ये त्यांनी शरद पवारांसह जात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. तर सध्या ते अजित पवार गटात आहेत. २ जुलै २०२३ या दिवशी त्यांनीही मंत्रिपदाची शपथ घेतली होती. सध्या छगन भुजबळ राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री आहेत. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची स्थापना छगन भुजबळ यांनी १ नोव्हेंबर १९९२ रोजी केली होती.



### सेनेला सोडचिठ्ठी देणारे पहिले बंडखोर

» मात्र छगन भुजबळ यांनी ओबीसीतून आरक्षण देण्यास विरोध दर्शवला. मराठा आरक्षणावरुन छगन भुजबळ हे मंत्रिपदाचा राजीनामा देऊ शकतात अशीही चर्चा सुरु आहे. अशात बुधवारी शिवसेना आमदार संजय गायकवाड आणि संजय शिरसाट या दोन्ही नेत्यांनी मंत्रिमंडळातून छगन भुजबळ यांची हकालपट्टी करावी अशी मागणी केली होती. यानंतर दुसऱ्याच दिवशी छगन भुजबळ भाजपाच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरु झाली. याचं महत्त्वाचं कारण आहे अंजली दमानिया यांनी केलेली पोस्ट. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी काही वेळापूर्वीच एक पोस्ट लिहिली आहे. या पोस्टमध्ये अंजली दमानिया म्हणतात, "भुजबळ भाजपाच्या वाटेवर?, एकेकाळी भुजबळांच्या भ्रष्टाचाराविरुद्ध जनहित याचिका करणारा भाजपा त्यांना मोठा ओबीसी नेता बनवणार? अशा भ्रष्ट माणसांना मोठं करणार, राजकारणासाठी? कुठे फेडाल हे पाप" अशी पोस्ट त्यांनी लिहिली आहे. त्यामुळे छगन भुजबळ हे भाजपाच्या वाटेवर आहेत का? अशी चर्चा सोशल मीडियावर सुरु झाली आहे.छगन भुजबळ यांनी त्यांच्या राजकीय आयुष्याची सुरुवात ही शिवसेना या पक्षापासून केली होती. शिवसेनेचे आक्रमक नेते म्हणून त्यांची ओळख होती. शिवसेनेला सोडचिठ्ठी देणारे ते पहिले बंडखोर होते.

आतासोडून भुजबळ भाजपात जाणार का? याची चर्चा अंजली दमानियांच्या पोस्टमुळे रंगली आहे.येत्या काही दिवसात छगन भुजबळ हे ओबीसींची सभाही घेणार आहेत. अशात छगन भुजबळ भाजपाच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरु झाली आहे. या चर्चेचं कारणही तसंच आहे.मराठा आरक्षणाचा अध्यादेश काढल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबईतल्या मोर्चाला मराठा आरक्षण देण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचं पुन्हा एकदा सांगितलं.

# डुप्लिकेट मनोज जरांगे सोशल मीडियावर तुफान व्हायरल!

## » तुळशीराम गुजर असं डुप्लिकेट मनोज जरांगे यांचं नाव, सेल्फी घेण्यासाठी होतेय गर्दी

। अमोलकुमार इंगळे ।

अकोला : महाईन्यूज

**मनोज जरांगे पाटील यांचं नाव सध्या प्रचंड चर्चेत आहे. मराठा आरक्षणाचा लढा त्यांनी उभा केला आहे. जालन्यातल्या आंतरवली सराटी गावाचे मनोज जरांगे पाटील यांना संघर्ष योद्धा, मराठा योद्धाही म्हटलं जातं आहे. त्यांनी आता गावागावांमध्ये सभा घेण्यास सुरुवात केली आहे. अशातच चर्चा सुरु झाली आहे ती आणखी एका मनोज जरांगे पाटील यांची.**



होय मनोज जरांगे पाटील यांच्यासारखेच हुबेहूब दिसणारे तुळशीराम गुजर हे अकोल्यातल्या मराठा मोर्चाच्या सभेत सहभागी झाले. प्रत्यक्षात मनोज जरांगेसोबत भेट होत नसल्याने अनेक जण त्यांच्या डुप्लिकेट्ससोबत सेल्फी घेण्यासाठी गर्दी करताना पहायला मिळत आहे.अकोल्यात राहणारे तुळशीराम गुजर हे हुबेहुब मनोज जरांगे पाटील यांच्यासारखे दिसतात. अकोला शहरातून मनोज जरांगे पाटील यांच्यासारखाच वेश परिधान करुन ते निघाले तेव्हा त्यांना पाहण्यासाठी गर्दी झाली. मनोज जरांगे पाटील यांच्यासारखेच दिसणारे तुळशीराम गुजर म्हणाले, "काही दिवसांपूर्वी मला मित्रांनी सांगितलं की तुम्ही मनोज जरांगे पाटील यांच्यासारखे दिसता.

मला विश्वास बसला नाही. मोबाइलवर त्यांचा फोटो आणि माझा फोटो दोन्ही पाहिले तेव्हा विश्वास बसला. मी मनोज जरांगे पाटील यांच्यासारखा दिसतो याचा मला आनंद आहे. सध्या रस्त्यावरुन चालत जातो तेव्हा लोक माझ्यासह फोटो काढण्यासाठी गर्दी करतात."मनोज जरांगे पाटील यांनी उभ्या केलेल्या मराठा आंदोलनाला माझा पाठिंबा आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळालंच पाहिजे.

मला खूप आनंद झाला आहे की मनोज जरांगे पाटील यांच्यासारखा दिसतो. त्यांनी जे आंदोलन सुरु केलं आहे त्या आंदोलनाला पाठिंबा आहे. त्यांना पाठिंबा मिळालाच पाहिजे कारण मनोज जरांगे पाटील यांनी घेतलेली भूमिका योग्यच आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळालंच पाहिजे." असं तुळशीराम गुजर यांनी सांगितलं आहे.

### मराठा आंदोलनाला माझा पाठिंबा

» अकोला शहरातील जुने शहर, गुलजापुरा आर्किडिएससमोर तुळशीराम गुजर राहतात. ते व्यवसायाने ट्रॅक्टर ड्रायव्हर आहेत. अकोला येथील एका प्रगतशील शेतकऱ्याच्या ट्रॅक्टरवर ते ड्रायव्हर म्हणून कामाला आहेत. तसेच अकोला महानगर पालिकेतील कचरा गाडीवरदेखील ते काम करतात. त्यांना तीन मुले,आई, पत्नी असा त्यांचा परिवार आहे. समाजकार्यात देखील ते हिरीरीने सहभाग घेतात. तुळशीराम गुजर यांना संपर्क करण्यासाठी 7499383811 या भ्रमणध्वी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन गुजर यांच्या मित्रपरिवारातर्फे करण्यात आले आहे.

# म्हणून नितीश कुमार आमच्याबरोबर!

## बिहारचे भाजपा प्रभारी विनोद तावडेंनी सांगितलं कारणं

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**जनता दल संयुक्तचे प्रमुख नितीश कुमार यांनी पुन्हा एकदा भरतीय जनता पार्टीबरोबर युती करून बिहारमध्ये सत्तास्थापन केली आहे. २०२० च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर नितीश कुमार यांनी भाजपाच्या साथीने राज्यात सत्तास्थापन केली होती. परंतु, काही महिन्यांनी त्यांनी भाजपाबरोबरची युती तोडून राष्ट्रीय जनता दलबरोबर आघाडी केली आणि राज्यात सत्तास्थापन केली. तसेच नितीश कुमार पुन्हा एकदा मुख्यमंत्री झाले. नितीश कुमार यांनी आता राजदची साथ सोडून पुन्हा एकदा भाजपाशी घरोबा केला आहे. नितीश कुमार यांनी असा निर्णय का घेतला? याबाबत अद्याप कोणीही स्पष्ट उत्तर दिलेलं नाही. अशातच भाजपा नेते आणि बिहार भाजपाचे प्रभारी विनोद तावडे यांनी नितीश कुमार यांनी पुन्हा एकदा भाजबारोबर संसार थाटण्याचं कारण सांगितलं.**



विनोद तावडे म्हणाले, आम्ही (भाजपा) आणि नितीश कुमार यांचा संयुक्त जनता दल हे दोन पक्ष मिळून बिहारचा राज्यकारभार चालवत होतो. आमचे आमदार जास्त असूनही आम्ही नितीश कुमार यांना मुख्यमंत्री केलं होतं. परंतु, त्यांच्या मनातली असुरक्षिततेची भावना आणि लालू प्रसाद यादव यांनी नितीश कुमार यांना दिलेली आश्वासनं यामुळे नितीश कुमार लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलबरोबर गेले. त्यांनी आमच्याबरोबरची युती तोडून राजदबरोबर राज्यात सत्ता स्थापन केली. परंतु, यामध्ये कळीचा मुद्दा ठरणारी घटना म्हणजे सव्वादोन महिन्यांपूर्वी बंगळुरू येथे इंडिया आघाडीच्या बैठकीत नितीश कुमारांकडे झालेलं दुर्लक्ष.माजी आमदार विनोद तावडे म्हणाले, बंगळुरू येथे झालेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची पंतप्रधनपदाचा उमेदवार म्हणून निवड करण्यात आली. तेव्हा नितीश कुमार यांना समजलं की, आपल्याला या लोकांनी वापरून घेतलं आहे. तिथे नितीश कुमार यांची जी मानसिकता होती, त्या मानसिकतेचा आम्ही स्वाभाविकपणे लाभ घेण्याचा प्रयत्न केला. त्यादृष्टीने आम्ही त्यांच्याशी संवाद सुरू केला. परंतु, चर्चेची गाडी पुढे जात नव्हती. परंतु, जेव्हा लालू प्रसाद यादव यांनी नितीश कुमार यांचा संयुक्त जनता दल पक्ष फोडण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या १० आमदारांना राजदबरोबर घेऊन तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री बनवण्याचा प्रयत्न केला गेला ती गोष्ट नितीश कुमार यांना खटकली. त्याचबरोबर आम्हालाही ते चालणार नव्हतं.बिहार भाजपाचे प्रभारी विनोद तावडे म्हणाले, तेजस्वी यादव बिहारचे मुख्यमंत्री होणं आम्हालाही चालणार नव्हतं. आम्ही एक राजकीय पक्ष आहोत. आम्हाला जसं सत्तेत यायचं असतं. तसंच राज्याचं हित जपायचं असतं. तेजस्वी यादव मुख्यमंत्री होऊन त्यांचं बिहारमध्ये सरकार आलं असतं तर राज्यात गुंडाराज सुरू झालं असतं. ते आम्हाला येऊ द्यायचं नव्हतं. आम्ही अनेकदा म्हटलं होतं की नितीश कुमार यांच्याबरोबर युती करणार नाही. परंतु, राजकारणात नेहमीच तसं करता येत नाही. तम्हाला राजकारणात सातत्याने बदलत्या स्थितीचा आढावा घेत आणि स्वतःचा विचार कायम ठेवत पुढं जावं लागतं.विनोद तावडे म्हणाले, आम्ही (भाजपा) आणि नितीश कुमार यांचा संयुक्त जनता दल हे दोन पक्ष मिळून बिहारचा राज्यकारभार चालवत होतो. आमचे आमदार जास्त असूनही आम्ही नितीश कुमार यांना मुख्यमंत्री

### स्वत:चा विचार कायम ठेवत पुढं जावं

» १० आमदारांना राजदबरोबर घेऊन तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री बनवण्याचा प्रयत्न केला गेला ती गोष्ट नितीश कुमार यांना खटकली. त्याचबरोबर आम्हालाही ते चालणार नव्हतं.बिहार भाजपाचे प्रभारी विनोद तावडे म्हणाले, तेजस्वी यादव बिहारचे मुख्यमंत्री होणं आम्हालाही चालणार नव्हतं. आम्ही एक राजकीय पक्ष आहोत. आम्हाला जसं सत्तेत यायचं असतं. तसंच राज्याचं हित जपायचं असतं. तेजस्वी यादव मुख्यमंत्री होऊन त्यांचं बिहारमध्ये सरकार आलं असतं तर राज्यात गुंडाराज सुरू झालं असतं. ते आम्हाला येऊ द्यायचं नव्हतं. आम्ही अनेकदा म्हटलं होतं की नितीश कुमार यांच्याबरोबर युती करणार नाही. परंतु, राजकारणात नेहमीच तसं करता येत नाही. तम्हाला राजकारणात सातत्याने बदलत्या स्थितीचा आढावा घेत आणि स्वतःचा विचार कायम ठेवत पुढं जावं लागतं.जनता दल संयुक्तचे प्रमुख नितीश कुमार यांनी पुन्हा एकदा भरतीय जनता पार्टीबरोबर युती करून बिहारमध्ये सत्तास्थापन केली आहे. २०२० च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर नितीश कुमार यांनी भाजपाच्या साथीने राज्यात सत्तास्थापन केली होती. परंतु, काही महिन्यांनी त्यांनी भाजपाबरोबरची युती तोडून राष्ट्रीय जनता दलबरोबर आघाडी केली आणि राज्यात सत्तास्थापन केली.

केलं होतं. परंतु, त्यांच्या मनातली असुरक्षिततेची भावना आणि लालू प्रसाद यादव यांनी नितीश कुमार यांना दिलेली आश्वासनं यामुळे नितीश कुमार लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलबरोबर गेले. त्यांनी आमच्याबरोबरची युती तोडून राजदबरोबर राज्यात सत्ता स्थापन केली. परंतु, यामध्ये कळीचा मुद्दा ठरणारी घटना म्हणजे सव्वादोन महिन्यांपूर्वी बंगळुरू येथे इंडिया आघाडीच्या बैठकीत नितीश कुमारांकडे झालेलं दुर्लक्ष.माजी आमदार विनोद तावडे म्हणाले, बंगळुरू येथे झालेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची पंतप्रधनपदाचा उमेदवार म्हणून निवड करण्यात आली. तेव्हा नितीश कुमार यांना समजलं की, आपल्याला या लोकांनी वापरून घेतलं आहे. तिथे नितीश कुमार यांची जी मानसिकता होती, त्या मानसिकतेचा आम्ही स्वाभाविकपणे लाभ घेण्याचा प्रयत्न केला. त्यादृष्टीने आम्ही त्यांच्याशी संवाद सुरू केला. परंतु, चर्चेची गाडी पुढे जात नव्हती. परंतु, जेव्हा लालू प्रसाद यादव यांनी नितीश कुमार यांचा संयुक्त जनता दल पक्ष फोडण्याचा प्रयत्न केला.

# राज्यपाल सत्तास्थापनेचं आमंत्रण देईनात?

## बिहारच्या शेजारी असलेल्या झारखंडमध्ये सत्तासंघर्ष सुरू

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**बिहारमधील तापलेलं राजकारण थंड होत नाही, तोच बिहारच्या शेजारी असलेल्या झारखंडमध्ये सत्तासंघर्ष सुरू झाला आहे. सक्तवसुली संचानालयाने (ईडी) झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांची बुधवारी नऊ तास चौकशी केली. त्यानंतर सोरेन यानी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यापाठोपाठ त्यांना ईडीने अटक केली.**

आज त्यांना ईडीच्या न्यायालयात हजर करण्यात आलं. या अटकेनंतर झारखंड मुक्ती मोर्चाने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे. सर्वोच्च न्यायालय याप्रकरणी शुक्रवारी सुनावणी करणार आहे. दुसऱ्या बाजूला झारखंड मुक्ती मोर्चाने चंपई सोरेन यांची सभागृह नेतेपदी नियुक्ती केली आहे. चंपई सोरेन आता मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याची तयारी करत आहेत. चंपई सोरेन यांनी राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा केला आहे. त्याचबरोबर ४७ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्रदेखील राज्यपालांकडे सुपूर्द केलं आहे. परंतु, राज्यपालांनी अद्याप चंपई सोरेन यांना शपथ ग्रहण करण्यासाठी आमंत्रित केलेलं



नाही. दुसऱ्या बाजूला भाजपाच्या गोटात बैठकांची सत्र चालू आहेत. त्यामुळे आमदार फूटण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अशातच चंपई सोरेन यांनी त्यांच्या सर्व सहकारी आमदारांना रांचीतल्या सर्किट हाऊसवर नेलं आहे. चंपई सोरेनदेखील तिथेच आहेत. सोरेन आणि झारखंड मुक्ती मोर्चाला राज्यपालांच्या आमंत्रणाची प्रतीक्षा आहे.दरम्यान, भाजपाने दावा केला आहे की बहुमत गाठता येईल इतके आमदार चंपई सोरेन यांच्याबरोबर नाहीत. तसेच राज्यपाल देखील सत्तास्थापनेचं आमंत्रण देईनात. अशा परिस्थितीत चंपई सोरेन यांनी आमदारांची परेड केली. या परेडद्वारे ४३ आमदार त्यांच्याबरोबर असल्याचं सोरेन यांनी सिद्ध केलं आहे.

### चंपई सोरेन यांचा प्लॅन बी तयार?

» परेडदरम्यान, या सर्व आमदारांनी सांगितलं की, ते चंपई सोरेन यांच्याबरोबर आहेत. ही परेड प्रसारमाध्यमांसमोर पार पडली. दरम्यान, ही परेड पाहून राज्यपाल त्यांना सत्तास्थापनेचं आमंत्रण पाठवतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आमदारांच्या परेडचा व्हिडीओ जारी केल्यानंतर चंपई सोरेन म्हणाले, आम्हाला आता केवळ राज्यपालांच्या आमंत्रणाची प्रतीक्षा आहे.कर्नाटक, महाराष्ट्र आणि बिहारमधील सत्तांघर्षावरून धडा घेत चंपई सोरेन आणि काँग्रेसने त्यांचा 'प्लॅन बी' सज्ज केला आहे. चंपई सोरेन यांना राज्यपालांनी सत्तास्थापनेसाठी आमंत्रित केलं नाही तर झारखंड मुक्ति मोर्चा आणि काँग्रेस त्यांच्या आमदारांना तेलंगणात हालवणार आहे. हैदाराबाद विमानतळावर बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे.

# प्रियांका चोप्रा-निक जोनासला सोडावं लागलं लॉसमधील घर

अभिनेत्री प्रियांका चोप्रा पती निक जोनास आणि मुलीसह लॉस एंजेलिसमध्ये राहते. पण तिला तिचं आलिशान घर सोडावं लागलं आहे. हे घर आता राहण्यायोग्य नाही. घरात पाणी गळतीमुळे बुरशी लागली आहे. बुरशी आरोग्यासाठी हानिकारक आहे, त्यामुळे घराची दुरुस्ती होईपर्यंत त्यांनी हे घर सोडलं आहे. हे जोडपं आता घराच्या जुन्या मालकाविरोधात कायदेशीर लढाई लढत असल्याचं म्हटलं जात आहे. पेज सिक्सच्या वृत्तानुसार, घरात ज्या काही समस्या आहेत, त्या आरोग्याच्या दृष्टिने चांगल्या नाहीत. प्रियांका आणि निक यांनी पाच वर्षांपूर्वी २०१९ मध्ये हे आलिशान घर २० मिलियन डॉलर्समध्ये खरेदी केले होते. या घरामध्ये सात बेडरूम, नऊ बाथरूम, टेम्प्रेचर कंट्रोल वाइन सेलर, किचन, होम थिएटर, बॉलिंग ॲली, स्पा आणि स्टीम शॉवर, जिम आणि एक बिलियर्ड्स रूम आहे.मे २०२३ मध्ये प्रियांका व निकने कायदेशीर खटला दाखल केलाय, असं म्हटलं जात आहे. अहवालानुसार, घर खरेदी केल्यानंतर काही दिवसांतच पूल आणि



स्पामध्ये समस्या दिसू लागल्या होत्या. वॉटरप्रूफिंग नसल्यामुळे घराच्या अनेक भागात बुरशी वाढू लागली, तसंच बारबेक्यूमध्येही पाणी गळत होतं, असं तक्रारीत म्हटलं आहे.प्रियांका चोप्रा आणि निक जोनास यांना त्यांच्या नुकसान भरपाई हवी आहे. या घराच्या दुरुस्तीसाठी जोनास दाम्पत्याने केलेला खर्च त्यांना घराच्या जुन्या मालकाकडून पाहिजे आहे. घराच्या दुरुस्तीत आतापर्यंत १५ मिलियन डॉलर्सहून अधिक खर्च झाला आहे. या घराची दुरुस्ती होईपर्यंत प्रियांका व निक आपल्या मुलीसह दुसरीकडे राहतील.अभिनेत्री प्रियांका चोप्रा पती निक जोनास आणि मुलीसह लॉस एंजेलिसमध्ये राहते. पण तिला तिचं आलिशान घर सोडावं लागलं आहे. हे घर आता राहण्यायोग्य नाही. घरात पाणी गळतीमुळे बुरशी लागली आहे. बुरशी आरोग्यासाठी हानिकारक आहे, त्यामुळे घराची दुरुस्ती होईपर्यंत त्यांनी हे घर सोडलं आहे. हे जोडपं आता घराच्या जुन्या मालकाविरोधात कायदेशीर लढाई लढत असल्याचं म्हटलं जात आहे. पेज सिक्सच्या वृत्तानुसार, घरात ज्या काही समस्या आहेत, त्या आरोग्याच्या दृष्टिने चांगल्या नाहीत.

## शिल्पाचा ‘या’ पुरस्काराने गौरव

अभिनेत्री शिल्पा शेट्टी सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. तीन दशकांहून अधिक काळापासून आपल्या अभिनयाने प्रेक्षकांचं मनोरंजन करणारी शिल्पा उत्तम डान्सरही आहे. छोट्या पडद्यावरील अनेक रिॲलिटी शोची परीक्षक म्हणून ती काम करते. अभिनयाबरोबरच ती तिच्या फिटनेससाठी खूप लोकप्रिय आहे. नुकतीच ती रोहित शेट्टीच्या ‘इंडियन पोलीस फोर्स’ या वेब सिरीजमध्ये झळकली. आता शिल्पाला एक पुरस्कार मिळाला आहे, तिनेच पोस्ट करून याबाबत माहिती दिली आहे. ‘चॅम्पियन्स ऑफ चेंज’ हा पुरस्कार समाज सेवा, सामाजिक विकास, शिक्षण, नवनवीन उपक्रम, क्रीडा आणि संस्कृती या क्षेत्रात काम करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दिला जातो. कला क्षेत्रातील योगदानासाठी ‘चॅम्पियन्स ऑफ चेंज २०२३’ हा पुरस्कार शिल्पा शेट्टी कुंद्राला देण्यात आला आहे.शिल्पा शेट्टीला गौरविण्यासाठी व्यासपीठावर आमंत्रित करण्यात आलं, तेव्हा सूत्रसंचालकाने तिच्या कला क्षेत्रातील कामगिरी सांगितली. “शिल्पा शेट्टी कुंद्रा तुम्ही एक प्रतिष्ठीत भारतीय अभिनेत्री आणि योग विद्येत पारंगत आहात. कला आणि कलाकाराला कोणतेही वय आणि सीमा नसते.

## सलमानसोबत दिसणार 'त्रिशा'!



साऊथमधील प्रसिद्ध अभिनेत्री म्हणून त्रिशाची ओळख आहे. तिचा चाहतावर्गही मोठा आहे. सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असणाऱ्या त्रिशाचा आणि थलापती विजयचा लिओ नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यालाही प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. आता मिळालेल्या माहितीनुसार, त्रिशा ही तब्बल तेरा वर्षांच्या ब्रेकनंतर बॉलीवूडमध्ये इंट्री करणार असल्याची माहिती आहे. साऊथमधील सर्वाधिक पॉप्युलर आणि मानधन घेणारी अभिनेत्री म्हणूनही त्रिशाचे नाव घेतले जाते. काही दिवसांपूर्वी एका वेगळ्या प्रकरणामुळे ती चर्चेत आली होती. तिच्या सहकारी कलाकारानं मन्सूर अली खाननं तिच्यावर आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. त्यामुळे त्रिशानं थेट कोर्टात धाव घेतली होती. कोर्टानं देखील मन्सूरला चांगलेच फटकारले होते. या सगळ्यात त्रिशानं मन्सुरनंही माफी मागितल्याचे दिसून आले आहे. १३ वर्षांच्या अंतरानं त्रिशा बॉलीवूडमध्ये चमकणार आहे. मीडिया रिपोर्टनुसार, त्रिशा ही विष्णु वर्धन यांची पुढील फिल्म ती मुख्य भूमिकेत दिसणार आहे. त्या चित्रपटामध्ये ती च क्क सलमान खानसोबत दिसणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. अजुन या चित्रपटाची अधिकृतपणे घोषणा झालेली नाही. मात्र ती लवकरच होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्रिशाच्या भूमिकेविषयी सांगायचे झाल्यास तिच्या गेल्या काही चित्रपटांना प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यात लिओचा मोठा वाटा आहे. तिच्या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवरही मोठी कमाई केली होती. २०१० मध्ये त्रिशानं अक्षय कुमारच्या खट्टा मिठा मध्ये काम केले होते. एका राजकीय विषयावर आधारित हा चित्रपट होता. त्यातील तिच्या भूमिकेचे कौतुकही झाले होते. सध्या त्रिशाच्या आगामी प्रोजेक्टविषयी सांगायचे झाल्यास, ती विदामुयार्ची नावाच्या तमिळ चित्रपटामध्ये दिसणार आहे. मल्याळम चित्रपट आयडेंटीटी नावाच्या चित्रपटातही तिची महत्वाची भूमिका आहे. त्यानंतर ती मणिरत्नम यांच्या ठग लाईफ नावाच्या चित्रपटामध्ये झळकणार आहे. कोर्टानं देखील मन्सूरला चांगलेच फटकारले होते. या सगळ्यात त्रिशानं मन्सुरनंही माफी मागितल्याचे

## प्रियांकाची ‘ही’ बहीण चढणार बोहल्यावर!

देसी गर्ल प्रियांका चोप्रा हिच्या बहिणींची नेहमी चर्चा रंगलेली असते. सध्या ‘बिग बॉस १७’मुळे मनारा चोप्रा चर्चेत आहे. तसंच दुसऱ्या बाजूला परिणीती चोप्राने संगीत क्षेत्रात पदार्पण केल्यामुळे चर्चा रंगली आहे. अशातच आता प्रियांकाची आणखी बहीण चर्चेत आली आहे. कारण आहे तिच लग्न. २४ सप्टेंबर २०२३ रोजी अभिनेत्री परिणीती चोप्रा मिसेज चड्ढा झाली. तिने आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्ढा यांच्याबरोबर लग्नगाठ बांधली. आता पुन्हा चोप्रा कुटुंबात सनई-चौघडे वाजणार आहेत. प्रियांका, परिणीतीची बहीण मीरा चोप्रा मार्चमध्ये लग्न करणार असल्याचं समोर आलं आहे. याचा खुलासा तिने स्वतः केला आहे.इस्टंट बॉलीवूड’ या एंटरटेनमेंट चॅनलशी बोलताना मीरा म्हणाली, “मी लग्न करणार आहे. सध्या लग्नाची तयारी सुरू आहे. मार्चमध्ये लग्न आहे. लग्नाचं ठिकाण ठरलं आहे. राजस्थानमध्ये पारंपरिक पद्धतीने लग्न होणार आहे.” त्यानंतर होणाऱ्या नवऱ्याबाबत विचारलं असता मीराने ते गुलदस्त्यात ठेवलं. पुढे मीराने म्हणाली, “लग्नासाठी प्रियांका व निक जोनस यांना आमंत्रण दिलं जाईल. जर ते कोणत्या प्रोजेक्टमध्ये व्यस्त नसतील तर ते नक्की येतील.”दरम्यान, मीराच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, ‘सेक्शन ३७५’, ‘सफेद’ यांसारख्या चित्रपटात तिने काम केलं आहे. मीराने दाक्षिणात्य सिनेसृष्टीतही आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. ती ‘मरुधामलाई’, ‘अन्बे आरुयीरे’ यांसारख्या चित्रपटात झळकली आहे.



## रश्मिका मंदानाचं विजय देवरकोंडाबद्दल विधान

लोकप्रिय अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि साऊथ स्टार विजय देवरकोंडा यांच्या नात्याची खूप चर्चा होत असते. दोघेही एकमेकांसह डेटिंग करत असल्याच्या आणि रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चा आहेत. पण त्यांनी मात्र याबाबत अधिकृत माहिती दिलेली नाही. नुकतंच रश्मिकाला तिच्या आणि विजयच्या बॉन्डबद्दल विचारण्यात आलं तेव्हा ती त्याच्याबद्दल भरभरून बोलली. विजय तिच्या आयुष्यातला खूप मोठा आधार आहे, असंही ती म्हणाली.एका मुलाखतीत रश्मिकाला तिच्या सहकलाकरांबरोबर असलेल्या नात्याबद्दल विचारण्यात आलं. ज्यात अमिताभ बच्चन (गुडबाय), रणबीर कपूर (ॲनिमल), विजय देवरकोंडा (गीता गोविंदम, डिअर कॉम्रेड), सिद्धार्थ मल्होत्रा (मिशन मजनू) आणि अल्लू अर्जून (पुष्पा) यांच्या नावांचा समावेश होता. त्यावर रश्मिका म्हणाली, “विजू आणि मी एकत्र मोठे झालो आहोत, त्यामुळे मी माझ्या आयुष्यात जे काही करते, त्यात त्याचंही योगदान असतं. मी त्याचा प्रत्येक गोष्टीत सल्ला घेते. मला नेहमी त्याचं मत जाणून घ्यायचं असतं आणि तो प्रत्येक गोष्टीत मी म्हणेन ते बरोबर असं म्हणणारा नाही.”पुढे रश्मिका म्हणाली, “विजय स्पष्ट बोलतो. ‘हे चांगल आहे’, ‘हे वाईट आहे’, ‘मला याबद्दल असं वाटतं’ असं तो सरळ सांगतो. माझ्या आयुष्यात कोणीही मला इतका पाठिंबा दिला नसेल, जितका विजयने दिला आहे.

# अधिक चतुराईने खेळण्याची गरज!

## भारताचे फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोड यांची प्रतिक्रिया

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीत पराभव पत्करावा लागल्यानंतर फलंदाजी आणि एकूण नियोजनावर होणाऱ्या टीकेला उत्तर देताना भारताचे फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोड यांनी दुसऱ्या कसोटीत इंग्लंडच्या आक्रमकतेला चतुराईने अर्थात अधिक विचारपूर्वक तोंड देण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात १९० धावांच्या पहिल्या डावातील आघाडीनंतरही भारताला सामना २८ धावांनी गमवावा लागला. घरच्या मैदानावर भारताचे पारडे जड मानले जात असताना देखील इंग्लंडने आपल्या 'बॅझबॉल' रणनीतीचा खुबीने वापर करून भारताला पराभूत केले. यात दुसऱ्या डावात ऑली पोपच्या १९६ धावांच्या खेळीचा प्रमुख वाटा होता.**



मालिकेतील दुसरा कसोटी क्रिकेट सामना शुक्रवारपासून सुरू होत आहे. भारतीय संघाच्या नियोजनाविषयी बोलताना राठोड म्हणाले,"भारतीय संघात असे युवा फलंदाज आहेत की जे कसोटी क्रिकेट फार कमी खेळले आहेत. त्यामुळे त्यांच्याबाबत निर्णय घेताना संयमी भूमिका घ्यायला हवी. शुभमन गिल, श्रेयस अय्यर, यशस्वी जैस्वाल हे फलंदाज गुणवान आहेत. त्यांच्याकडून धावा होतील याची आम्हाला खात्री आहे,"असे बुधवारच्या सराव सत्रानंतर आयोजित पत्रकार परिषदेत राठोड यांनी सांगितले.जैस्वालने पहिल्या डावात ८० धावांची खेळी केली असली, तरी गिल आणि अय्यर दोन्ही डावांत प्रभाव पाडू शकलेले नाहीत. गिल आणि अय्यर यांनी अनुक्रमे आतापर्यंत २१ आणि १३ कसोटी सामने खेळले आहेत. गिल तर गेल्या ९ सामन्यांतून एकदाही अर्धशतक झळकावता आले नाही. अय्यर पूर्णपणे अपयशी आहे. "आंतरराष्ट्रीय स्तर लक्षात घेता या सगळ्या गोष्टी बरोबर आहेत. सलग दुसऱ्या सामन्यात विराटशिवाय खेळावे लागणार आहे. अशा वेळी संधी मिळालेल्या फलंदाजांकडून धावा होण्याची आवश्यकता आहे. ठोस सकारात्मक मानसिकतेने खेळणे आणि आक्रमक खेळणे यात मोठा फरक आहे. कसे खेळायचे हे निश्चित असावे. खेळाडूंनी ठोस उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून खेळावे अशी आमची इच्छा आहे," असे राठोड म्हणाले.भारतीय फलंदाज गुणवान असले, तरीही त्यांच्या खेळात सुधारणेला नक्कीच वाव आहे, असे राठोड म्हणाले. खेळपट्टीचे स्वरूप आणि सामन्याची परिस्थिती पाहून निर्णय घेणे आवश्यक आहे. खेळपट्टीवर परिस्थिती लक्षात घेऊन कसे सुरक्षित खेळता येईल या विचारांचा अभाव दिसून येत आहे. यासाठीच फलंदाजांनी अधिक विचारपूर्वक खेळण्याची गरज असल्याचे राठोड यांनी सांगितले. " आमचे फलंदाज पारंपरिक पद्धतीने खेळले. इंग्लंडच्या फलंदाजांनी 'स्विप'चा चांगला वापर केला. तो आमच्या फलंदाजांना जमला नाही. त्यासाठी 'स्विप'चा विशेष सराव आवश्यक आहे," असे राठोड म्हणाले.मालिकेतील दुसरा कसोटी क्रिकेट सामना शुक्रवारपासून सुरू होत आहे. भारतीय संघाच्या नियोजनाविषयी बोलताना राठोड म्हणाले,"भारतीय संघात असे युवा फलंदाज आहेत की जे कसोटी क्रिकेट फार कमी खेळले आहेत. त्यामुळे त्यांच्याबाबत निर्णय घेताना संयमी भूमिका घ्यायला हवी. शुभमन गिल, श्रेयस अय्यर, यशस्वी जैस्वाल हे फलंदाज गुणवान आहेत. त्यांच्याकडून धावा होतील याची आम्हाला खात्री आहे,"असे बुधवारच्या सराव सत्रानंतर आयोजित पत्रकार परिषदेत राठोड यांनी सांगितले.जैस्वालने पहिल्या डावात ८० धावांची खेळी केली असली, तरी गिल आणि अय्यर दोन्ही डावांत प्रभाव पाडू शकलेले नाहीत. गिल आणि अय्यर यांनी अनुक्रमे आतापर्यंत २१ आणि १३ कसोटी सामने खेळले आहेत. गिल तर गेल्या ९ सामन्यांतून एकदाही अर्धशतक झळकावता आले नाही. अय्यर पूर्णपणे अपयशी आहे. "आंतरराष्ट्रीय स्तर लक्षात घेता या सगळ्या गोष्टी बरोबर आहेत.

### सुरक्षित खेळता येईल

» सलग दुसऱ्या सामन्यात विराटशिवाय खेळावे लागणार आहे. अशा वेळी संधी मिळालेल्या फलंदाजांकडून धावा होण्याची आवश्यकता आहे. ठोस सकारात्मक मानसिकतेने खेळणे आणि आक्रमक खेळणे यात मोठा फरक आहे. कसे खेळायचे हे निश्चित असावे. खेळाडूंनी ठोस उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून खेळावे अशी आमची इच्छा आहे," असे राठोड म्हणाले.भारतीय फलंदाज गुणवान असले, तरीही त्यांच्या खेळात सुधारणेला नक्कीच वाव आहे, असे राठोड म्हणाले. खेळपट्टीचे स्वरूप आणि सामन्याची परिस्थिती पाहून निर्णय घेणे आवश्यक आहे. खेळपट्टीवर परिस्थिती लक्षात घेऊन कसे सुरक्षित खेळता येईल.

# मुंबई इंडियन्सचे 'हे' प्रताप तुम्ही वाचलेत का?

## जोहान्सबर्ग संघाला 8 षटकात 98 धावांचे लक्ष्य मिळाले

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबई इंडियन्स हा आयपीएल स्पर्धेतल्या सर्वात यशस्वी संघापैकी एक संघ. मुंबई इंडियन्सने पाचवेळा या स्पर्धेचं जेतेपद पटकावलं आहे. मुंबई इंडियन्सचा प्रचंड असा चाहता वर्गही आहे. आयपीएल सुरू झालं तेव्हापासून एक ब्रँड म्हणून मुंबई इंडियन्सने चाहत्यांच्या मनात आणि बाजारपेठेत आपलं स्थान निर्माण केलं आहे.**

मुंबईने आपला करिष्मा वाढवताना दुबईत सुरू झालेल्या IL20 आणि दक्षिण आफ्रिकेत सुरू झालेल्या SA20 स्पर्धेत संघ खरेदी केला आहे. मुंबई इंडियन्स संघाकडून खेळणारे बरेच खेळाडू या नव्या संघांकडून खेळताना दिसतात. सध्याच्या घडीला दुबई आणि दक्षिण आफ्रिकेत लीग सुरू आहेत. या लीगमध्ये मुंबई इंडियन्सचे संघ खेळत आहेत. पण या सामन्यांमध्ये मुंबईकडून झालेल्या चुका सच्च्या चाहत्यांना पटणार नाहीत. काय झालं नेमकं ते वाचाच.ठिकाण- दुबई. लीगचं नाव- IL20. संघ- मुंबई इंडियन्स एमिरेट्स आणि डेझर्ट व्हायपर्स. मुंबई इंडियन्स एमिरेट्स संघाची प्रथम फलंदाजी सुरू होती. १६व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर अंबाती रायुडू बाद झाला. वानिंदू हासारंगाने त्याला बाद केलं. रायुडूने २३ धावांची खेळी केली.रायुडू तंबूत



परतत असताना पुढचा फलंदाज ओडियन स्मिथ मैदानात अवतरला. त्याचं आणि टीम डेव्हिडचं बोलणं झालं. प्रतिस्पर्धी संघाने क्षेत्ररक्षण सजवायला सुरुवात केली. तितक्यात चौथे पंच अलीम दार मैदानातल्या पंचांना काहीतरी खुणावून सांगत असल्याचं दिसलं. मैदानातील पंच रुचिरा पल्लियागुरुगे आणि अकबर अली यांनी चौथे पंच अलीम दार यांच्याशी चर्चा केली. तोपर्यंत अलीम दार आणि मुंबई इंडियन्स एमिरेट्सचे फलंदाजी प्रशिक्षक अजय जडेजा तसंच कर्णधार निकोलस पूरन यांच्यात चर्चा झाली. आयपीएलच्या धर्तीवर या स्पर्धेतही सुपरसब नियमाची तरतूद आहे. संघाला आवश्यकता वाटेल त्यावेळी अंतिम अकरातून एका खेळाडूला बाजूला करुन नव्या खेळाडूला पाचारण करता येतं. एकदा बदली खेळाडूला घेतलं की मूळ खेळाडू फलंदाजी, गोलंदाजी किंवा क्षेत्ररक्षण करू शकत नाही. मुंबई इंडियन्सच्या अंतिम अकरात ओडियन स्मिथचं नाव नव्हतं.नाणेफेकेवेळी सुपरसब्स खेळाडूंची यादी प्रतिस्पर्धी संघाला देणं अपेक्षित असतं.

### स्मिथला खेळण्यापासून रोखलं

» मुंबई इंडियन्स एमिरेट्सने नाणेफेकेवेळी दिलेल्या सुपरसब्सच्या यादीत ओडियन स्मिथचं नाव नव्हतं. संघव्यवस्थापनाच्या ही गोष्ट लक्षात आली नाही. त्यांनी स्मिथला मनमुराद फटकेबाजीच्या उद्देशाने पाठवलं. पण चौथ्या पंचांच्या ही गडबड लक्षात आली आणि त्यांनी मैदानावरील पंचांना ही गोष्ट लक्षात आणून दिलं. त्यांनी स्मिथला खेळण्यापासून रोखलं. पंचांनी परवानगी नाकारल्याने ओडियन स्मिथ माघारी परतला. स्मिथला संधी मिळणार नसल्याचे स्पष्ट होताच ड्वेन ब्राव्हो फलंदाजीला उतरला. ब्राव्होने १० चेंडूत १० धावा केल्या. ब्राव्हो आणि डेव्हिड जोडीने सातव्या विकेटसाठी २१ चेंडूत ३७ धावांची खेळी केली.